पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १३

**सभावृत्तांत**

**दिनांक – २४/०१/२०२०** **वेळ – दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **२४/०१/२०२०** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.तुषार रघुनाथ हिंगे - सभापती**
२. मा. अभिषेक गोविंद बारणे
३. मा. बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन
४. मा. डोळस विकास हरिश्चंद्र
५. मा. सागर बाळासाहेब गवळी
६. मा. अपर्णा निलेश डोके
७. मा. नढे विनोद जयवंत
८. मा. निलेश हिरामण बारणे

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण बास्केट बॉल मैदान पेठ क्र.९ मधील इमारत नाममात्र दराने चालवण्यास देणेबाबत.- मा.सागर गवळी , मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) इंटरनॅशनल लेवल किक बॉक्सींग चँपियन शिप, दिल्ली येथे जाणेकामी आर्थिक सहाय्य मिळणेबाबत. – मा.निलेश बारणे , मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) मनपाची डोळस तालीम व्यायामशाळा ही डोळस तालीम व्यायाम मंडळ भोसरी यांना चालविण्यास दिलेल्या व्यायामशाळेस मुदतवाढ देणेबाबत.

विषय क्र.६) मनपाची प्रभाग क्र.१८ चिंचवडगाव येथील कै.दिनकर गजाबा भोईर व्यायामशाळा ही चालविण्यास दिलेल्या व्यायामशाळेस मुदतवाढ देणेबाबत.

----------

ठराव क्रमांक – ७१ विषय क्रमांक – ०१
दिनांक – २४/०१/२०२० विभाग - क्रीडा
सुचक – मा.सागर गवळी अनुमोदक – मा.विकास डोळ
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/१२/२०२० दि.०४/०१/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

क्रीडा धोरणात एशियनक्रीडा स्पर्धेत सुवर्ण पदक विजेत्या खेळाडूस र.रु.२,००,०००/- आर्थिक सहाय्य अदा करणेचे धोरण आहे. कु.श्रेया शंकर कंधारे, निगडी, पुणे ४४ हीने ९ वी एशियन

योगा स्पोर्टस चॅम्पियनशीप २०१९ येसू (साऊथ कोरीया) येथे झालेल्या स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त केल्यामुळे तीला र.रू.२,००,०००/- (अक्षरी र.रु.दोन लाख फक्त) आर्थिक सहाय्य अदा करणेस देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२ विषय क्रमांक – ०२

दिनांक – २४/०१/२०२० विभाग - क्रीडा

सुचक – मा.बाबा त्रिभुवन अनुमोदक – मा.सागर गवळी

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/१३/२०२० दि.०४/०१/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.महापालिका सभा ठराव क्र.१२०६ दि.२०/१०/२०११ व मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७/कावि/१८८/२०१२ दि.०४/०७/२०१२ मध्ये नमुद केलेप्रमाणे, क्रीडा धोरणतील अट क्र.२३ मध्ये खेळाडू दत्तक योजने अंतर्गत निवड झालेल्या खेळाडूने सलग २ वर्षात राज्य, राष्ट्रीय व आंतरविद्यापीठ स्तरावर प्राविण्य न मिळविल्यास अशा खेळाडूंना तेथून पुढे या योजनेचा लाभ दिला जाणार नाही असे नमुद आहे. त्यानुसार खेळाडू दत्तक योजना २०१८-१९ चे लाभार्थी १४ खेळाडूंना त्यांच्या प्राविण्या बाबत संबंधीत क्रीडा पर्यवेक्षक व क्रीडा अधिकारी यांनी तपासणी केली असता ८ खेळाडू पात्र व ४ खेळाडू उर्वरीत २ खेळाडूपैकी १ खेळाडूला नोकरी लागले कारणाने अर्ज दाखल केलेला नाही व दुसरा खेळाडूस दूरध्वनीद्वारे संपर्क केला असता त्याने प्राविण्य नाही म्हणून अर्ज सादर करणार नाही असे सांगितले. असा अहवाल क्रीडा विभागाला दिलेला आहे. ८ पात्र खेळाडूंना खेळाडू दत्तक योजना २०१९ - २० चा लाभ १ वर्षाकरीता देणेस व त्याकामी येणा-या खर्चास र.रू.१९,७८,४००/- (अक्षरी र.रु.एकोणीस लाख अठ्ठयाहत्तर हजार चारशे फक्त) चे खर्चास व सदरचा खर्च खेळाडू दत्तक योजना या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस तसेच सध्या मनपाच्या वतीने महापौर चषक शालेय क्रीडा स्पर्धा २०२०-Teen20 चालू आहेत. या स्पर्धेत मनपा शाळेची मुले विजयी झालेली आहेत. त्यांना खेळाडू दत्तक योजनेप्रमाणे आहार भत्ता मंजूर करणेकामी मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ७३ विषय क्रमांक – ०३

दिनांक – २४/०१/२०२०

सुचक – मा.सागर गवळी अनुमोदक – मा.विकास डोळस

मा.सागर गवळी, मा.विकास डोळस यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने भोसरी येथील पिं.चिं.मनपाचे नवनगर विकास प्राधिकरण बास्केट बॉल मैदान पेठ क्र.०९ मधील इमारत बरेच दिवस बंद असल्याचे दिसून येत आहे. महानगरपालिकेच्या क्रीडा विभागाच्या वतीने मनपाकडील सर्व व्यायामशाळा खाजगी संस्थांना चालवण्यास देण्याचा विचार असून भोसरी गावामध्ये ॲपल फिटनेस हेल्थ क्लब या नावाने संस्था असून २०० ते २५० तरुण विद्यार्थी तसेच ७० ते ८० महिला विद्यार्थी आहेत. तसेच जेष्ठ नागरीक व मनपा शाळेतील विद्यार्थी यांना मोफत प्रशिक्षण देणेत येते. याठिकाणी कुशल प्रशिक्षक व ट्रेनर असून सर्व व्यायाम साहित्याची माहिती आहे. तरी भोसरी येथील

पिं.चिं.मनपाचे नवनगर विकास प्राधिकरण बास्केट बॉल मैदान पेठ क्र.०९ मधील इमारत योग्य ती अनामत रक्कम भरुन व्यायामशाळेसाठी चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिति सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिति सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४ विषय क्रमांक – ०४

दिनांक – २४/०१/२०२०

सुचक – मा.निलेश बारणे अनुमोदक – मा.सागर गवळी

मा.निलेश बारणे , मा.सागर गवळी यांनी प्रस्तावित केलेनुसार दि.९ ते १३ फेब्रुवारी २०२० याकाळात दिल्ली येथे इंटरनॅशनल लेवल किक बॉक्सींग चँपियन शिप या स्पर्धा आयोजित केल्या असून सदर स्पर्धेसाठी मनपा परिसरात आयोजित केल्या असून सदर स्पर्धेसाठी मनपा परिसरातील १) सुरज एस राक्षे २) तेजल पवार या खेळाडुंची निवड झाली आहे. या २ खेळाडुंना सदर स्पर्धेस जाणेकामी प्रत्येकी रक्कम रुपये ४५,०००/- आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिति सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिति सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५ विषय क्रमांक – ०५

दिनांक – २४/०१/२०२० विभाग - क्रीडा

सुचक – मा.बाबा त्रिभुवन अनुमोदक – मा.सागर गवळी

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/४४/२०२० दि.१८/०१/२०२०

मा.स्थायी समिति सभा सदस्य ठराव क्र २०९७ दि.३१/०१/२०१८ अन्वये मा आयुक्त यांचेकडील आदेश क्रमांक क्रीडा/०३/कावि/२७२/२०१८ दि.१०/०९/२०१८ अन्वये डोळस तालीम व्यायामशाळा भोसरी हि डोळस तालीम व्यायाम मंडळ भोसरी या संस्थेस सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास दिलेल्या व्यायामशाळेची मुदत दि.०९/०८/२०१९ रोजी संपुष्टात आलेली आहे. डोळस तालीम व्यायाम मंडळ भोसरी दि.१३/१२/२०१९ च्या मागणीनुसार व प्रभारी क्रीडा पर्यवेक्षक ई क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील अहवालनुसार डोळस तालीम व्यायामशाळा भोसरी हि डोळस तालीम व्यायाम मंडळ भोसरी या संस्थेस दि.१०/०८/२०१९ पासून ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रू.२०००/- मनपाकडून देवून व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देण्यास मुदतवाढ चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिति सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिति सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६ विषय क्रमांक – ०६

दिनांक – २४/०१/२०२० विभाग - क्रीडा

सुचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर गवळी

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/०१/२०२० दि.१८/०१/२०२०

मा. स्थायी समिति सभा सदस्य ठराव क्र ३०२१ दि.०८/०८/२०१८ अन्वये मा आयुक्त यांचेकडील आदेश क्रमांक क्रीडा/०३/कावि/३९८/ २०१८ दि.०३/११/२०१८ अन्वये मनपाची प्रभाग क्र १८ चिंचवडगाव

कै दिनकर गजाबा भोईर व्यायामशाळा हि उत्कर्ष मित्र मंडळ माणिक कॉलनी चिंचवड या संस्थेस सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास दिलेल्या व्यायामशाळेची मुदत दि.०२/१०/२०१९ रोजी संपुष्टात आलेली आहे.संस्थेने दि.११/११/२०१९ च्या पत्रान्वये व्यायामशाळा पुन्हा सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास मुदतवाढ मिळण्याबाबत मागणी केलेली आहे. त्यानुसार कै.दिनकर गजाबा भोईर व्यायामशाळा ही उत्कर्ष मित्र मंडळ माणिक कॉलनी चिंचवड या संस्थेस पुढील मुदतवाढीचा ठराव मंजूर झाल्यानंतर आदेशाच्या तारखेपासून दरमहा र.रू.२०००/- मनपाकडून देवून ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **तुषार रघुनाथ हिंगे** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४६/२०२०
दिनांक : २४/०१/२०२०

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.